**नि.दि.दावा क्रं.९४/२०१२**
**नि.क्र. ७१**

**वादीतर्फे साक्षीदार क्र. ०१**
**शपथेवर कथन करतो की,**

**नाव — दिपक गोपाळराव वानखडे**

**प्रतिवादीतर्फे उलटतपास विधीज्ञ श्री. व्ही. जी. मालपे**

**०७.** माझ्या आईची जन्मतारीख मला सांगता येत नाही. माझी आई २६/०३/२००१ रोजी मयत झाली. माझे वडील गोपाळराव यांचे मुळ गाव वरुड आहे. माझ्या आईचे वडीलांसोबत लग्न कोणत्या वर्षी झाले, हे मी सांगु शकत नाही. मला संगीता व ज्योती या दोन बहीनी आहेत. ज्योती सन २००० मध्ये मयत झाली आहे. तिचे पती नागदेव व मुलगा सागर व मुलगी पुजा आज रोजी जिवंत आहे. माझी आई वडीलांसोबत पहीला वरुड येथे राहीली, त्यानंतर ते दोघे राउरकेला (ओरीसा) येथे राहीली व त्यानंतर ते दोघे परत वरुड येथे राहीले. माझी आई वरुड येथे मयत झाली. माझे वडील नागपुर येथे मयत झाले. मयत होणे पुर्वी ३ ते ४ वर्ष माझे वडील नागपुर येथे राहत होते.

**०८.** प्र. तुमची आई गंगुबाई यांच्या नावाने कोण कोणती मालमत्ता होती?
उ. मला शेती बद्दल माहीत आहे. घर व दुकान आजीच्या नावाने आहे किंवा नाही हे मला माहीत नाही.

**०९.** माझे आजोबा राजाराम खासबागे यांच्या नावाने कोण कोणती मालमत्ता होती या बद्दल मला माहीत नाही. माझे आजोबा राजाराम १९७५ साली मयत झाले. माझ्या आईची प्रकृती मयत होण्याच्या ५ ते ७ वर्षांपासुन बरोबर राहत नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, माझे आजोबा राजाराम यांनी माझ्या वडीलांच्या नावाने १२/०५/१९७४ रोजी एक प्लॉट खरेदी करुन दिला होता. माझ्या वडीलांनी निळकंठ झाडे यांना एक प्लॉट ३१/०५/१९८२ रोजी विकला होता. माझ्या वडीलांनी ओरीसा वरुन आल्यानंतर वरुड येथे धान्याचा व्यवसाय सुरु केला होता.

**१०.** माझी आजी गंगुबाई हिला एकुण ४ मुले व २ मुली होत्या. गंगुबाईच्या चार मुलांची नावे भाउराव खासबागे, विष्णु खासबागे, सुरेश खासबागे आणि प्रकाश खासबागे अशी होती. भाउराव हे माझे सर्वात मोठे मामा आहेत. भाउराव यांचे लग्न कोणत्या वर्षी

झाले होते हे मी सांगु शकत नाही. भाउराव यांच्या पत्नीचे नाव काय होते, हे मी सांगु शकत नाही. भाउराव व त्यांची पत्नी कोणत्या वर्षी वारली, हे मी सांगु शकत नाही. विष्णु यांचे लग्न झाले नाही. विनोद हा विष्णुचा मुलगा नाही.

**११**. प्रं. विनोद हा विष्णुचा मुलगा असल्याने त्याला सदर दाव्यात पार्टी म्हणुन समाविष्ट केले आहे ?

उ. कोर्टाचे आदेशान्वये केले आहे.

**१२**. सुरेश यांच्या पत्नीचे नाव मला माहीत नाही. सुरेशराव कधी वारले हे मी सांगु शकत नाही. मी माझ्या आई वडीलांसोबत वरुड येथे सन २००३ पर्यत राहत होतो. हे म्हणणे खरे नाही की, साल १९७३ पासुन माझ्या कुटुंबाचे खासबागे कुटुंबाकडे येणे जाणे नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, खासबागे कुटुंबाच्या कार्यक्रमांमध्ये माझे जाणे येणे नव्हते. माझी आजी गंगुबाई हीच्या माहेरचे अडनाव मला माहीत नाही. गंगुबाईचे वडील व आई यांची नावे मला माहीत नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, सुरेश, प्रकाश व विष्णु हे तिघे वेगवेगळे राहतात. या तीनही लोकांचे वेगवेगळे व्यवसाय होते. माझे आजोबाचे घर कोणत्या वार्ड नंबर मध्ये होते हे मला आठवत नाही. सुरेश, प्रकाश व विष्णु हे कधीपासुन वेगवेगळे राहु लागले, हे मला आठवत नाही.

**<u>प्रतिवादीच्या वकीलांच्या तोंडी विनंती वरुन उलट तपास पुढील तारखेपर्यंत तहकुब</u>**

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत

दिनांक : १०/१२/२०२४.
ठिकाण : वरुड.

Ajit Bharat Katte
Digitally signed by Ajit Bharat Katte
Date: 2024.12.10 16:59:56 +0530

**( ए. बी. कट्टे )**
दिवाणी न्यायाधिश क.स्तर,
वरुड